# 1942 चे चले जाव आंदोलन

*डेंगळे सचिन गुंडीराम*
*संशोधक विद्यार्थी,*



**प्रस्तावना :–**

ऑगस्ट १९४२ मध्ये सुरू झालेल्या या आंदोलनाला 'चले जाव आंदोलन' हे नाव दिले गेले होते. गांधीजींना लागलीच अटक करण्यात आली होती. परंतु देशभर युवा कार्यकर्त्यांनी बंद, तोडफोडीच्या पद्धतीने आंदोलन चालू ठेवले होते. कॉंग्रेसमध्ये जयप्रकाश नारायण सारखे समाजवादी सदस्य भूमिगत राहून आंदोलनात सक्रीय होते. पश्चिम भारतात सातारा आणि पूर्वेमध्ये मिदनापूर यासारख्या काही जिल्हयांमध्ये प्रतिसरकाराची स्थापना केली गेली होती. इंग्रजांनी आंदोलनाच्या विरोधात अतिशय तातडीची पावले उचलली. तरीपण हा विद्रोह थांबविण्यासाठी सरकारला वर्षभरापेक्षा जास्त वेळ लागला. क्रिप्स मिशन वापस गेल्यावर कॉंग्रेसची अखिल भारतीय कमिटीची बैठक २७ एप्रिल १९४२ ला अलाहाबाद येथे सुरू झाली. यामध्ये जपानच्या संभावित आक्रमणावर विचार केला गेला. यामध्ये हे ठरविले गेले की, जपानच्या सेनेचा मुकाबला अहिंसात्मक व असहयोगात्मक या मार्गाने केला जाईल. कॉंग्रेसचा हा निर्णय महात्मा गांधीजींच्या विचारधारेला धरून केला गेला होता. त्या वेळेस गांधीजींच्या मनात काय विचार चालू होते हे त्यांच्या पुढील वाक्यातून स्पष्ट होते– ''इंग्रज एकदा भारतातून निघून गेले. मी एक वायदा करतो की, कॉंग्रेस, मुस्लिम लीग आणि देशातील सर्व दलांच्या लक्षात येईल की त्यांचे भले एकत्रित येण्यातच आहे.

ब्रिटिश या भारतात आपली सत्ता चालवितात म्हणून जपानी आपल्या भारतावर आक्रमण करू पाहतात. इंग्रज या भारतातून पूर्णतः निघून गेले तर, त्यांच्या मित्रराष्ट्रांचे लक्ष एकदम नैतिक आधारावर राहील. भारतामध्ये जर राष्ट्रीय सरकार कायम झाले आणि जे माझ्या मतानुसार असेल तर त्या सरकारचे पहिले काम हे असेल की, आक्रमणकारी राष्ट्रांचा बचाव करण्यासाठी मित्रराष्ट्रांसोबत करार करणे.'' गांधीजींच्या या वाक्यावरून हे स्पष्ट होते की, त्यांच्या मतानुसार जपानच्या आक्रमणापासून भारताचे रक्षण करण्याचा हा उपाय आहे की इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करून आपल्या साम्राज्यवादाचा अंत करावा. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र केल्यावर या देशातील विविध पक्षांचे लोक एकत्र येतील आणि एक नवे सरकार स्थापन होईल. भारतीय जनता असहकाराच्या नीतीचा वापर करून आक्रमण करणाऱ्यांचा मुकाबला करण्यासाठी समर्थ होईल.

जुलै १९४२ मध्ये कॉंग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक वर्ध्यामध्ये झाली. १४ जुलै ला तिथे जो प्रस्ताव स्वीकृत केला गेला, त्यातील महत्त्वपूर्ण बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१.वर्तमान परिस्थिती लक्षात घेता कॉंग्रेसची ही निश्चित धारणा झालेली आहे की, भारतातील ब्रिटिशांनी आपली सत्ता लवकरात लवकर सोडून द्यावी.

२.क्रिप्स योजनेपासून हे स्पष्ट झाले आहे की, भारताप्रति ब्रिटिश सरकारच्या मनोवृत्तीमध्ये काहीही परिवर्तन झालेले नाही.

३.कॉंग्रेसला हे अपेक्षित नव्हते की, मलाया, सिंगापूर आणि ब्रह्मदेशावर जी वेळ आली आहे तीच वेळ भारतावर यावी म्हणून त्यांनी जपान किंवा कोणत्याही विदेशी शक्तिविरोधात संघटन उभे केले.

४.भारतीयांमध्ये इंग्रज राजवटीविरोधात जो विरोध आहे, त्या विरोधाला कॉंग्रेस स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय थांबविता येणार नाही असे सांगत होते.

५.या लढयाचे नेतृत्त्व गांधीजींकडे असेल.

वर्ध्यामध्ये स्वीकृत झालेल्या या प्रस्तावाचा अभिप्राय हा होता की, कॉंग्रेसने हे स्पष्ट केले की ब्रिटिशांनी भारतावरील साम्राज्य सोडून देऊन या ठिकाणी राष्ट्रीय सरकारची स्थापना करावी. तेव्हाच भारत ब्रिटनला व त्यांच्या मित्रराष्ट्रांना युद्धामध्ये मदत करेल. परंतु ब्रिटनने भारताला स्वतंत्र केले नाही. तर गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्यासाठी अहिंसात्मक मार्गाने संघर्ष करेल.

कॉंग्रेसच्या कार्यकारिणी समितीने जो प्रस्ताव १४ जुलै ला वर्ध्यामध्ये स्वीकार केला होता, त्यावर विचार करण्यासाठी

अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अधिवेशन मुंबईमध्ये बोलाविले गेले. तिथे ८ ऑगस्ट १९४२ ला हा प्रस्ताव स्वीकारला गेला. त्यामध्ये म्हटले होते की, अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी आपल्या कार्यसमितीद्वारा १४ जुलै ला स्वीकृत केलेल्या प्रस्तावाला पूर्ण समर्थन देते. आग्रहाने नमूद करते की, भारतामधून ब्रिटिशांची सत्ता गेली पाहिजे याचा पुनरूच्चार करते. भारताच्या स्वातंत्र्याची घोषण केल्यावर अस्थायी सरकारची स्थापना केली जाईल आणि स्वतंत्र भारत मित्रराष्ट्रांचा मित्र होईल. या अस्थायी सरकारचे पहिले काम अहिंसात्मक शक्तीच्या माध्यमातून मित्रराष्ट्रांमध्ये मिळून भारताचे रक्षण करणे आणि आक्रमणाला विरोध करणे.

अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीद्वारा स्वीकृत हा प्रस्ताव भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संघर्षात एक महत्त्वाचा टप्पा होता. यामध्ये कॉंग्रेस ब्रिटिश सरकारला सरळ-सरळ शब्दांत सांगितले की, भारताला स्वातंत्र्या द्या. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य द्यावे. नाही दिले तर गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली अहिंसात्मक मार्गाने संघर्षाला सुरुवात केली जाईल. चलो जाव आंदोलन ठराव पारित झाल्यावर गांधीजींनी आपल्या भाषणामध्ये म्हटले की, ''आता आपल्यापैकी प्रत्येकाने आता स्वतंत्र आहोत असे समजले पाहिजे, तसेच आपण असे कार्य केले पाहिजे की आपण स्वतंत्र आहोत. मी स्वतंत्रतेपेक्षा कमी गोष्टींवर कधी संतुष्ट होणार नाही. आता नुसते जेलमध्ये जाऊन उपयोग होणार नाही. करो या मरो (Do or Die).'' भारत छोडो आंदोलनाला 'ऑगस्ट क्रांतीच्या' नावानेही ओळखले जाते.

### *गांधीजींच्या केलेल्या सूचनाः*

१.कर्मचाऱ्यांनी नोकरी सोडू नये. परंतु कॉंग्रेसप्रति आपली निष्ठा ठेवावी.

२.सैनिकांनी आपल्या देशवासियांवर गोळी मारण्यासाठी विरोध करा.

३.राजा-महाराजांनी भारतीय जनतेचे प्रभुत्व स्वीकारावे. त्यांच्या राज्यात राहणारी जनता ही भारतीय राष्ट्राचे अंग आहे याची घोषणा करावी.

४.विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत शाळेत जायचे नाही.

क्रिप्स मिशनची असफलता, जपानी आक्रमणाचे भय, युद्धामध्ये भारताची खराब होत चाललेली आर्थिक स्थिती या सर्वांमुळे ब्रिटिश साम्राज्यावर असलेला विश्वास कमी होत होता.

भारत छोडो आंदोलनाची सुरुवात ८ ऑगस्ट १९४२ ला झाली. दुसऱ्याच दिवशी ९ ऑगस्टला 'ऑपरेशन झिरो आवर' च्या नियमानुसार सर्व मोठया नेत्यांना अटक केली गेली. गांधीजींना पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये ठेवले गेले आणि कार्यसमितीच्या इतर सदस्यांना अहमदनगर किल्ल्यात ठेवले गेले. त्याचबरोबर कॉंग्रेस ही संस्था अवैध घोषित करण्यात आली व त्या संघटनेच्या सर्व नेत्यांना व कार्यकर्त्यांना अटक करण्याची मोहीम चालू झाली. गांधीजी व प्रमुख नेत्यांना अटक केल्यामुळे देशामध्ये एकही नेता राहिला नाही जो कॉंग्रेसद्वारा चालविलेल्या अहिंसात्मक सत्याग्रहाचे संचलन करू शकेल. नेत्यांशिवाय देशातील 'चले जाव' आंदोलनाचे नेतृत्त्व स्वतः लोकांनी आपल्या समजानुसार चालविले.

दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांचा पराजय होत होता. जपानच्या विजयाने दक्षिण-पूर्व आशियातून ब्रिटिशांच्या साम्राज्यावादाचा अंत झाला होता. सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्त्वात आझाद हिंद सरकारची स्थापना झाली होती. आझाद हिंद सेना भारताला स्वतंत्र करण्यासाठी आसामच्या सीमेपर्यंत पोहचली होती. क्रिप्स मिशनद्वारे भारतीय जनतेने चांगल्या-वाईट गोष्टींचा अनुभव घेतला होता. इंग्रज भारतावरील पकड कमी करीत नव्हते. देशातील सर्व नेते हे अनुभव घेत होते की, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हीच वेळ आहे. आता आपण जर स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला तर तो आता असफल होणार नाही असे वाटत होते. राजेंद्र प्रसाद यांनी यावेळी म्हटले होते की, ''आम्हाला या वेळेस गोळी खाण्यासाठी व तोफांचा सामना करण्यासाठी तयार राहिले पाहिजे.'' पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानुसार, ''आम्ही आगीसोबत खेळायला चाललो आहोत.'' सरदार पटेल यांच्या शब्दामध्ये, ''हयावेळेसचे आंदोलन हे कमी काळ परंतु अतिशय भयंकर होणार.'' गांधीजींनी घोषणा केली होती की, ''मी कॉंग्रेसला शर्यतीला लावलेला आहे. ती विजयी होईल किंवा मरून जाईल.''

९ ऑगस्टला गांधीजींना व नेत्यांना अटक केल्यावर सरकारने पहिले आक्रमण कॉंग्रेसच्या स्वयंसेवकांच्या रॅलीवर केले. ही रॅली मुंबईमध्ये होणार होती व राष्ट्रीय झेंडयाला सलामी दिली जाणार होती. पोलिसांनी राष्ट्रीय झेंडयाला खाली पाडून दिले व स्वातंत्र्यसैनिकांना अटक केली. मुंबई प्रांतात सार्वजनिक सभेला व उठावाला बंदी घालण्यात आली होती. जेव्हा जनतेने या आज्ञांचा भंग केला, तेव्हा त्यांचा लाठीचार्ज करण्यात आला. अश्रुधूराचे नळकांडे फोडण्यात आले. आंदोलनकर्त्यांवर गोळया झाडण्यात आल्या. मुंबई प्रांताप्रमाणेच इतरही प्रांतांत हयाच आज्ञा तुरंत लागू केल्या. सगळीकडे कॉंग्रेस कार्यालयाला कुलुपे लावण्यात आली. ज्यांचा कॉंग्रेसशी संबंध आहे त्यांनाही अटक करण्यात आली. नेत्यांच्या अटकेची वार्ता आल्यावर विद्यार्थी शाळा-कॉलेजात गेले नाहीत. सर्व ठिकाणी सरकारच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. उत्तेजित मुलांनी रेल्वेच्या पटऱ्या उखडून टाकल्या. तार, टेलिफोनच्या तारा तोडल्या. पोस्ट ऑफिस, रेल्वे स्टेशन, ठाणे आदी सरकारी इमारती जाळल्या. पोलिसांवर आक्रमणे केली. या युवकांचा उद्देश हा होता की, युद्धकार्यामध्ये सरकारला परेशान करणे आणि इंग्रजांना देशावर शासन करता येऊ नये.

१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाने किती उग्र रूप धारण केले होते याचा अंदाज या आकड्यांनी निश्चित करता येईल. जो की, फेब्रुवारी १९४३ मध्ये भारत सरकारचे युद्धसदस्य सर रेजिनाल्ड मॅक्सवेल ने केंद्रीय विधानसभेमध्ये सादर केले होते. या आकड्यांनुसार १९४२ च्या आंदोलनात पोलीस आणि सेनाद्वारे ५३८ वेळेस गोळ्याा झाडल्या, ज्यामुळे ९५० लोक मारले गेले आणि १३६० जखमी झाले. ६०२२९ लोकांना अटक केली होती. २०० च्या वर रेल्वे स्टेशन नष्ट केले होते. ५५० डाकखान्यांवर हल्ला झााला होता. त्यामध्ये ५० जाळले होते. २०० डाकखान्यांचे फार नुकसान झाले होते. ३५०० ठिकाणच्या तारेच्या व टेलिफोनच्या तारा कापल्या होत्या. ७० पोलीस स्टेशन आणि ८५ अन्य सरकारी इमारती जाळल्या होत्या.

जनतेच्या विद्रोहाने उग्र रूप धारण केले होते. हे संपविण्यासाठी सैन्यशक्तीचा स्वच्छंद व विकृत वापर केला गेला. बिहार, बंगाल आणि उडिसामध्ये सरकारने विमानांतून जनतेवर बॉम्बचा वर्षाव केला. कॉंग्रेसच्या इमारतीतील कागदपत्रे जाळून टाकली.

युवकांवर लाठीहल्ला, बेताचा वार केला गेला. थोडेही कारण सापडल्याबरोबर गोळया झाडण्यात आल्या. स्त्रियांचा अपमान केला. फोडाफोडीच्या गुन्ह्यांबद्दल ज्या युवकांना अटक केली होती, त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आले. त्यांना अनेक प्रकारचा त्रास देऊन आणखी कोण-कोण यात सामील होते? त्यांची नावे वदवून घेण्यात आली. सरकारी स्वातंत्र्यसैनिकांच्या सोबत वाईट वर्तन करीत होते.

### *समारोपः*

ऑगस्ट १९४२ मध्ये भारतामध्ये आंदोलनाला जो प्रारंभ झाला होता, त्याला अनेक ठिकाणी असाधारण यश मिळाले. मध्य प्रांतापासून आसामच्या सीमेपर्यंत जाणाऱ्या रेल्वेला युद्धाच्या दृष्टीने अतिशय महत्त्व होते. या रेल्वेद्वारे युद्धाची सामग्री आसामपर्यंत पोहचवली जात होती. इंग्रज सैनिकसुद्धा जपान आणि आझाद हिंद सेनेच्या आक्रमणाचा सामना करण्यासाठी याच रेल्वेने सीमाप्रदेशापर्यंत पोहचत होते. जनतेने या रेल्वेला अनेक ठिकाणी उखडून टाकले आणि विशेष रेल्वे स्टेशनला जाळून टाकले. पूर्वीच्या संयुक्त प्रांतातील बलिया जिल्ह्यामध्ये आंदोलनाने इतका जोर पकडला की, काही वेळातच तेथील इंग्रजी शासनाचा अंत झाला. तीच दशा मुंबई प्रांतातील सातारा जिल्ह्यामध्ये झाली. साताऱ्यामध्ये काही काळासाठी जनतेने आपले स्वतंत्र शासन स्थापित केले (प्रतिसरकार). त्यांनी जनआंदोलनाचे आयोजन केले, त्याचप्रमाणे रचनात्मक कार्य केले. शेतकऱ्यांचा दबदबा व दलितांच्या सहकार्याने चालणारे साताऱ्याचे प्रतिसरकार सरकारच्या दमनामुळे व शेवटी कॉंग्रेसच्या असहमतीमुळे १९४६ च्या निवडणुकीपर्यंत चालले.

अशा प्रकारे '१९४२ चे चले जाव' आंदोलन हे गांधीजींच्या जीवनातील तिसरे मोठे आंदोलन होते. 'चले जाव' आंदोलन हे जनांदोलन होते. जगत्जेत्या इंग्रजांना हे आंदोलन थांबविण्यासाठी एक वर्षापेक्षा जास्त काळ लागला. या आंदोलनामुळे भारतातील युवक भारतीय स्वातंत्र्याकडे आकर्षित झाला. त्याचेच पर्यवसान भारतीय स्वातंत्र्यात झाले.

### *संदर्भ ग्रंथः*

१.डॉ. कुमार नलिन, कुमार आशुतोष, नवीन कुमार, विनित कुमार, UGC (CBSE) NET/JRF/SET, अरिहंत प्रकाशन, मेरठ, पृष्ठ क्र. ७७२-७७३.

२.डॉ. सुरेश कुमार पाण्डेय, UGC (CBSE) NET/JRF/SET, उपकार प्रकाशन, आग्रा.

३.प्रो. हरि वासुदेवन, भारतीय इतिहास के कुछ विषय- भाग-३, NCERT, नई दिल्ली, पृष्ठ ३६२-३६३.